# श्री. पुनाजी नामदेवराव पौनीकर

सेवक क्र. ३७३ लाल दरवाजा, तांडापेठ, नागपूर

आम्ही या मार्गाचा स्वीकार करण्यापुर्वी फार दुःखी होतो. दुःख म्हणजे असे की माझ्या मुलाची प्रकृती बरी राहत नव्हती. मेडीकल कॉलेजच्या डॉक्टरांनी टी.बी. आहे असे सांगितले. एके दिवशी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास त्याच्या तोंडातून एक जंतू पडला. मुलाला फार तहान लागत होती. डोळे आणि पाय फारच ताणत होता. रात्री दोन वाजता मी तांडापेठच्या वैद्याकडे गेलो. परंतु त्यांची भेट झाली नाही. नंतर आमच्या घराजवळील या मार्गाचे सेवक श्री. गणपत पटेल यांना बोलाविले आणि त्यांना तीर्थ करुन देण्यास सांगितले. त्यांनी तीर्थ करुन दिले परंतु आराम पडला नाही. नंतर दुसऱ्या वैद्याला बोलविले. रात्र निघाली पण आराम पडला नाही. शेवटी त्याच्या नाकातुन रक्तसुध्दा निघू लागले. ते पाहून आम्ही सर्वांनी विचार केला आणि पुन्हा गणपत पटेल यांना बोलाविले. त्यांनी तीर्थ करुन दिले. त्याच रात्री मुलाला आराम पडला. दुसऱ्या दिवसापासून रक्त जाणे बंद झाले आणि तो खेळू पण लागला. नंतर पटेलांनी सात दिवस तीर्थ बनवून दिले आणि प्रकृती एकदमच चांगली झाली. नंतर आम्ही बाबांकडे गेलो आणि त्यांना घडलेली घटना सांगितली. बाबांनी मार्गाविषयी पूर्ण माहिती सांगितली. नंतर तीन दिवसाची अगरबत्ती दिली. ती संपल्यानंतर बेचाळीस दिवसांचे कार्य दिले. नंतर तेही पूर्ण केले. आता आम्हाला कोणत्याही प्रकारचा त्रास होत नाही. आम्ही सर्व आनंदात आहोत.

* * * * *